



# अरण्यानुभव







डॉ. नीलिमा कुलकर्णी



ई साहित्य प्रतिष्ठान

सादर करत आहे

# अरण्यानुभव

(प्रवासवर्णन)

## लेखिका : डॉ. नीलिमा कुलकर्णी

# अरण्यानुभव

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : लेखकांना फ़ोन करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

## असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

## दाम नाही मागत. मागत आहे दाद.

## साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

# अरण्यानुभव

लेखिका - डॉ. नीलिमा कुलकर्णी
Address - D/28, palm Acres Society, M. Phule Road, Mumund( E), Mumbai -400 081.
Phone - 09619911705.
Mail - drneelimakulkarni@gmail.com

Photo: Kaushal Jain, Kishor Kokate, Kishor Wadnere, Wikipedia (Creative licence)

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी लेखकाची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (दंड व तुरुंगवास) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशक ई साहित्य प्रतिष्ठान :

www.esahity.com

www.esahity.in

esahity@gmail.com

प्रकाशन : १ ऑक्टोबर २०२०

©esahity Pratishthan®2020

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य-प्रतिष्ठानचीलेखी परवानगी घेणे कायद्याने आवश्यक आहे.

डॉ. नीलिमा कुलकर्णी.



MSc; MSc; PhD; DHE; PGD in NGO managemant; successfully completed certificate course in translation skills ( English-Marathi) by IIKEM, Thane, Maharashtra.

**शैक्षणिक**

1. स्टेट आणि नेशनल स्कॉलर
2. मुंबई येथील वझे महाविद्यालयातून, प्राणीशास्त्र - विभाग प्रमुख पदावरून २०१५ मध्ये निवृत्त
3. एक शिक्षक म्हणून ३९ वर्षांचा प्रदीर्घ अनुभव ( यु जी आणि पी जी स्तरावर)
4. मुंबई विद्यापीठातील प्राणीशास्त्र विषयातील पी एच डी मार्गदर्शक –
5. २ विद्यार्थ्यांना पी एच डी साठी, ३ विद्यार्थ्यांना पी जी प्रकल्पासाठी मार्गदर्शन तसेच अनेक विद्यार्थ्यांना यु जी प्रकल्पांसाठी मार्गदर्शन.
6. अनेक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय परिषदांमध्ये सहभाग आणि शोध निबंध वाचन
7. शोध निबंध प्रकाशित.
8. मुंबई विद्यापीठाच्या अनेक संशोधन प्रकल्पांमध्ये प्रकल्प प्रमुख किवा प्रकल्प सहाय्यक म्हणून सहभाग.
9. अनेक शैक्षणिक आणि कॉर्पोरेट आस्थापनात पर्यावरण विषयक भाषणं

10. ‘हरियाली’ या पर्यावरण क्षेत्रात काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थेची - मुलुंड विभाग प्रमुख
11. प्राणीशास्त्र विषयातील ४ पुस्तके प्रकाशित
12. पर्यावरण क्षेत्रातील कामासाठी समाजसेवी पुरस्कार -२०१८, जेष्ठ नागरिक संघ, मुलुंड तर्फे

**साहित्य**

1. डॉ. अभिजित कुलकर्णी यांच्या एन बी टी ने प्रकशित केलेल्या दंतवैद्यकशास्त्रा संबंधित्त पुस्तकाचा अनुवाद, एन बी टी कडून प्रकाशित.
2. ‘कुमारकोश’ साठी नोंदींचे लिखाण
3. ‘विश्वकोश’ साठी लिखाण, प्राणीशास्त्र मंडळाची सभासद.
4. १९९५ पासून आकाशवाणीवरून प्रसारित होणाऱ्या परिसर, ऐसी अक्षरे रसिके, चिंतन, झळा या लागल्या जीवा, अशा कार्यक्रमांसाठी लेखन.
5. ‘आपलं पर्यावरण’ या मासिका साठी गेली १२ वर्ष लेखन.
6. ‘विवेक’ मध्ये प्रकाशित लेख आणि ‘जीवजागर’ हे सदर.
7. २०२० मधील लोकसत्ताच्या ‘कुतूहल’ सदरासाठी लेखन
8. ‘मुलुंड नागरिक’ साठी लेखन.
9. ‘हरियाली’च्या विवध उपक्रमांच्या प्रसिध्धीसाठी केलेले लेखन.
10. Successfully Completed certificate course in Translation skills ( English – Marathi) conducted by Indian Institute of Knowledge Engineering & Management .

## प्रस्तावना

आपली जंगलं, अभयारण्ये, राष्ट्रीय उद्यान म्हणजे आपली फुफ्फुसं आहेत. या अशा जंगलातून फिरतांना आलेले अविस्मरणीय अनुभव सांगतांना मला अत्यंत आनंद होत आहे. जंगलातील वास्तव्य, जंगलातील फिरणं, प्राणी, पक्षी, पाण्याची खळखळ, निसर्गातील संगीत, अन एकूणच तिथलं वातावरण, तिथला निसर्ग हे एक अजब रसायन असतं. तुम्ही ते अनुभवलं असेलही परंतु त्या अनुभवाबरोबरच अशा जागेत फिरतांना आपण किती जवाबदारीने वागले पाहिजे हे ही लक्षात ठेवले पाहिजे...

हा रोमांचकारी अनुभव, तुम्ही प्रत्यक्ष तिथे जाईपर्यंत तुम्ही पण घ्यावा या हेतूने लिहिलेले हे एक छोटेसे पुस्तक...आनंद देणारे...रोमांच आणणारे ...नक्की वाचा...तुम्हाला निश्चित आवडेल ...

डॉ. नीलिमा कुलकर्णी.

अनुक्रमणिका

जंगलातील पशूसफारी म्हणजे काय?

जवाबदार निसर्ग पर्यटन

कान्हा राष्ट्रीय उद्यान

वाघांचा इलाका- रणथंभोर

बांधवगढ अभयारण्य

नांदुर मधमेश्वर पक्षी अभयारण्य

## जंगलातील पशूसफारी म्हणजे काय?

निसर्गाच्या सान्निध्यात जायला आवडणार नाही असा मनुष्य विरळाच..आणि म्हणूनच निसर्गात गेल्यावर, त्याच्याशी जवळीक साधतांना, त्याचा आस्वाद घेतांना निसर्गाचा अनादर होणार नाही, त्याची अमर्यादा होणार नाही याची काळजी घेणे महत्त्वाचे ठरते. त्याच्या भव्यातेपुढे, अथांगपणापुढे नतमस्तक होउन त्या गोष्टीची जाणीव ठेवणे हे प्रत्येक निसर्गप्रेमीचे कर्तव्य असायला हवे. कोणत्याही वयाच्या व्यक्तीला प्राण्यांचे आकर्षण असतेच आणि वन्यप्राणि बघण्यासाठी लोकं विविध राष्ट्रीय उद्यानात, प्राणीसंग्रहालयात अथवा अभयारण्यात जातात. त्यात सुद्धा पशुसफारीची मागणी करतात.

इथे एक गोष्ट आवर्जून सांगावीशी वाटते कि वन्यप्राण्यांना पाहता पाहता त्या जंगलाचा गंध, त्यातील सौंदर्य, तिथला निसर्ग, तेथील घटकांचे एकमेकावर अवलंबून असणे हे सर्व टिपणे, अनुभवणे हे सुध्धा तितकेच रोमांचकारी असते. अर्थात वन्य प्राण्यांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पाहणे, त्यांच्या लकबी, त्यांची शिकार करण्याची पध्धत, त्यांचे पारिवारिक जीवन, त्यांचे परस्परसंबंध हे सर्व जवळून पाहणे खूप रंजक आणि सुरस असतेच..

सफारी म्हणजे काय? आपण वाहनात किवा पिंजऱ्यात बसून मोकळ्या असलेल्या वन्य प्राण्यांना त्यांच्या नैसर्गिक वातावरणात/ अधिवासात पाहणे, चकित होणे आणि त्यातील आनंद अनुभवणे. या साठीच पशुसफारी असाव्यात. कोणत्याही सफारीचा विचार केला तर त्या मध्ये मुख्यतः चार घटक लक्षात येतात. सफरीचे आयोजक, पर्यटक, जंगलखाते आणि सफारीसाठी काम करणारे कामगार अर्थात, गाईड्स, जिप्सीचे चालक, जंगल खात्यातील माणसे वगेरे वगेरे...या बरोबरच

लोकांची मानसिकता, जंगलखात्याचे प्रयत्न आणि टूर आयोजकाची मानसिकता या गोष्टी सुध्धा तितक्याच महत्त्वाच्या ठरतात. .

कोणत्याही अभयारण्यात किवा राष्ट्रीय उद्यानात जंगलाचे मुख्यत्वे दोन भाग करता येतात. एक म्हणजे बफर झोन/ टूरिस्ट झोन आणि कोअर झोन. आपण पर्यटक टूरिस्ट झोन मध्ये फिरतो. पशुसफारी सुध्धा याच झोन मध्ये असते. कोअर झोन मध्ये सर्व सामान्य पर्यटकाला जाता येत नाही. कोअर झोन मध्ये माणसांचे अतिक्रमण सहसा होत नाही असे अनेक वन्यजीव सफारीचे आयोजक, मुंबई ट्रावेलर या टूर कंपनीचे संस्थापक श्री. सौरभ ठकेकर ठासून सांगतात. त्यांच्या म्हणण्या प्रमाणे ‘वन खाते, वनरक्षक या बाबतीत खूप सतर्क असतात. कोअर झोन मध्ये शिरणे तितकेसे सोपे देखील नसते कारण तेथे कुंपण, संरक्षक भिंत, रक्षक, कॅमेरा या सर्व गोष्टी असतात. खात्याने केलेले नियम पाळले जातात कि नाही याकडे त्यांचे सतत लक्ष असते. नियम मोडल्यास दंडासहित जिप्सीच्या चालकाची, गाईड

ची नोकरी देखील जाऊ शकते. इतकेच नव्हे तर क्वचित पर्यटकांवर सुध्धा बंदी घातली जाऊ शकते आणि त्यामुळेच कदाचित सर्वसामान्यांना वाटते त्या प्रमाणात पशुसफारीचा गैरवापर होत नाही’.

हे जरी खरे असले तरी टूरिस्ट झोन मध्ये असतांना काही नियमांचे उल्लंघन होत असते आणि त्या साठी पर्यटकांची मानसिकता जास्त कारणीभूत असते. पर्यटकांकडून होणाऱ्या विविध प्रकारच्या दबावांना मार्गदर्शक अथवा चालक बळी पडतो आणि मग रस्त्यावरून बाजूला जाणे, जिप्सी बाहेर जाणे, वेळेच्या मर्यादेचे उल्लंघन करणे, पिसं, कात अथवा शिंग उचलणे, प्राण्याच्या खूप जवळ जाणे, फोटोचा फ्लाश उडवणे असे प्रकार घडतात. अर्थात सर्व पर्यटकांना दोष देता येणार नाही परंतु वन्यप्राणि पाहायला येणाऱ्या पर्यटकांनी जास्त जवब्दारीने वागणे अपेक्षित असते. क्वचित एखाद्या प्रभावशाली/बड्या ब्यक्तीच्या नातेवाईकांचा आग्रह, किवा मोठ्या ‘टीप’ चे अमिष, या गोष्टींमुळे सुध्धा नियमांचे उल्लंघन होत असते परंतु त्याची टक्केवारी फार कमी असते. काही पर्यटक वेगळे असतात. त्यांना वाघासारखा एखादा मोठा प्राणि, होणारी शिकार, अथवा एखादा दुर्मिळ पक्षी अथवा प्राणि पाहण्याची

इच्छा असते आणि त्यासाठी ते अनेक क्लुप्त्या लढवितात. खरे म्हणजे ही मानसिकता बदलायला हवी. अशा परिस्थितीत अयोजकाची आणि जंगल खात्याची मानसिकता नियमाला धरून राहण्याची असणे खूप गरजेचे आहे. या मध्ये जीपच्या ड्रायव्हरची भूमिका आणि त्याला वन्य प्राण्याविषयी वाटणारी आत्मीयता महत्वाची ठरते.

श्री. सौरभ ठकेकर म्हणतात, “ हे खरे आहे कि गिर येथील सफारी ची सुरुवात ‘बेट’ अथवा ‘प्राण्यांसाठी आमिष’ बांधूनच झाली. त्यामध्ये एखाद्या फार्म हाउसवर प्राण्याचे आमिष दाखवून सिंहाला बोलावले जाई. याला ‘लायन शो’ असे म्हणत. सिंहाला कष्ट न करता शिकार मिळे आणि पर्यटकांना सिह पाहिल्याचे समाधान. परंतु काही दिवसांनी हे लक्षात आले कि यामुळे सिंहाची शिकार करण्याची उर्मी कमी होत जाईल. आता असे शो बंद झाले आहेत. आता खरे म्हणजे सिंहाच्या एकेक कळपाच्या मागावर असतात गीरच्या जंगलातील ‘मालधारी’ जमातीतील लोक. त्यांना प्रत्येक कळपाची संपूर्ण माहिती असते. याचा मोठा फायदा म्हणजे कळपातील प्रत्येक प्राण्याची माहिती सहज

मिळू शकते.” गिर मध्ये जसे हे मालधारी तसे मसाईमारा येथील मसाई जमात. ह्या अशा जंगलात राहणाऱ्या आणि जंगलावर अवलंबून असणाऱ्या भटक्या जमाती अजूनही आहेत. ही जंगलात टोळीने राहणारी माणसे प्राण्यांची काळजी घेतांना दिसतात. ते प्राण्यांना चांगले ओळखतात, एव्हढेच नव्हे तर प्राणि सुध्धा त्यांना ओळखतात.

गेल्या काही वर्षांपासून वन्यप्राण्यांनी सुध्धा जिप्सीला जंगलाच्या पर्यावरणाचा एक भाग म्हणून स्वीकारले आहे असे दिसते. बहुतेक वेळा वाहनांची दखल न घेता ते जंगलात फिरत असतात, त्यांची दैनंदिन कामे करत असतात. परंतु कधी कधी केवळ काही पर्यटकाच्या अट्टाहासामुळे / इच्छेसाठी वन्यप्राण्याच्या खाजगी जागेत, खाजगी आयुष्यात डोकावले जाते आणि मग क्वचित व्यक्तीवर किवा जीप्सीवर हल्ला होणे अशा घटना घडतात. हे होते कारण आपण पर्यटक त्यांच्या प्रदेशात अतिक्रमण करतो . अशावेळी नियम मोडून, अतिक्रमण करून त्यांना (प्राण्यांना) पाहण्याचा हक्क आपल्याला कोणी दिलाय का हा प्रश्न पडल्या वाचून राहत नाही. वर नमूद केल्याप्रमाणे क्वचित

पावलांच्या ठशांचा मागोवा घेत घेत जिप्सी ठरलेल्या मार्गाने न जाता वेगळ्या मार्गावर आत घुसवली जाते. याचे कारण म्हणजे पर्यटक अनेक प्रकारचे असतात. काहींना वन्यप्राणी अगदी पाहायचेच असतात, तर काहींना - आम्ही हा प्राणि इतक्या जवळून पाहीला - म्हणून मिरवायचे असते, तर काहींना फक्त त्यांचे फोटो काढायचे असतात आणि आता पशुसफारीसाठी येणाऱ्या पर्यटकांची संख्याही वाढते आहे. पर्यटक हा सतत बदलणारा घटक असल्यामुळेच क्वचित सफारींचा गैरफायदा घेतला जातोही. पशुसफारींचे आयोजक (मुंबई ट्रावेलर्स) श्री. जोगिंदर यांच्या म्हणण्या प्रमाणे “अलीकडे हे असे क्वचित होते आणि कोअर झोन मधील अतिक्रमण फार कमी प्रमाणात होताना दिसते. पर्यटकांना समजावून सांगण्यात पुढाकार घेऊन अशा गोष्टी टाळताही येऊ शकतात”. ही गोष्ट खूप आशादायी वाटते. प्राणी खूप हुशार असतात. आराखडे बांधण्यात तरबेज असतात. त्यांनी आता माणसांच्या जंगलातील वावराला स्वतःसाठी अनुकूल करून घेतले आहे. आणि म्हणूनच आपल्याला हे वन्यप्राणी पशु सफारीतून जवळून पाहायला मिळतात.

म्हणूनच शेवटी असे म्हणावेसे वाटते पंचतारांकित हॉटेलमध्ये जा, एखाद्या हिल स्टेशनवर जा, डोंगरांवर जा पण कधीतरी राष्ट्रीय उद्यानात जा, अभयारण्यात जा.वन्यप्राणि पाहायला जातांना, सफारीची सफर करतांना जंगलाचा शोध घ्या, जंगल अनुभवा, त्याचा गंध नाकात साठवा, निसर्गातील मधुर गाणे ऐका आणि निसर्गाशी एकरूप व्हा. जंगल कसं असत हे एकदा अनुभवलं कि जंगलात जाण्याचं वेडच लागतं. जंगलात अवश्य जा त्याच्या श्वासात तुमचा श्वास घ्या. तेथील गर्द झाडी, पाण्याची खळखळ, मोकळ आकाश, पक्षी प्राण्यांनी एकमेकांना दिलेले इशारे, वाघाची चाहूल, नशिबात असेल तर प्रत्यक्ष दर्शन हे सर्व थ्रील अनुभावायला जंगलात जायलाच हवे...तुम्हाला हवा तो वन्यप्राणी दिसला तर छानच पण नाही दिसला तर ... जंगलाचा अनुभव पुनः पुनः जगा... पहा किती छान वाटेल ते...

# जवाबदार निसर्ग पर्यटन

मनुष्य प्राणी अनेक वर्षे निसर्गातील प्राणी आणि वनस्पती यांच्या बरोबर गुण्यागोविन्द्याने राहिला, मिळून मिसळून वाढला, त्याने त्यांची काळजी घेतली देखभाल केली. माणूस हळूहळू प्रगत झाला, शेती करू लागला, विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या सहाय्याने त्याने अनेक शोध लावले.. उद्योग वाढले, प्रगती झाली, लोकसंख्या वाढली, पैसा वाढला, आणि त्याबरोबर ताणतणाव देखील वाढले... आज तेल उद्योग, संगणक उद्योग, मोटार व्हेईकल उद्योग आणि पर्यटन उद्योग हे जगातील अत्यंत महत्त्वाचे आणि प्रगत असे व्यवसाय मानले जातात..

अलीकडच्या काळात पर्यटन हा अतिशय फायदेशीर असा उद्योग मानला जातो. तीर्थयात्रा, मंगल कार्ये, अशा काही विशेष कारणांमुळे प्रवास करणारा माणूस आता सहज म्हणून, आनंद म्हणून, काहीतरी नवीन पहायला, जाणून घ्यायच्या हेतूने फिरायला लागला. पूर्वीच्या काळी अवघड वाटणारा प्रवास अनेक कारणांमुळे आता सहज शक्य होऊ लागला आहे . केवळ सुट्ट्यांमध्ये प्रवासाला जाणे हे जाऊन आता दर आठवड्याला शनिवारी – रविवारी माणूस छोट्या पर्यटनासाठी बाहेर पडू लागला. दोन दिवस बाहेर जाऊन आले, कि नविन आठवड्याची सुरुवात नव्या हुरुपाने करता येते अशा समजुतीने ती गरज बनत गेली. माणसाच्या दैनंदिन आयुष्यातील ताण-तणाव, सततची धावपळ, विविध मार्गांनी, कष्टाने अथवा कष्ट न करता मिळणाऱ्या जास्तीच्या पैशाची उपलब्धता या मुळे या गरजेला मान्यता मिळत गेली. प्रवासाची हौस वाढली, देशात अथवा परदेशात विविध ठिकाणं पाहणं हा एक स्टेटस सिम्बॉल बनला, हाताशी पैसा होताच...या पार्श्वभूमीवर पर्यटनाला एक उद्योग, व्यवसाय

असा दर्जा मिळाला. अनेक लोकांना काम मिळाले आणि पर्यटकांची संख्या दिवसेंदिवस वाढीस लागली.

हे खरे असले तरी, या बदलत्या परिस्थितीत पर्यटन व्यवसायाचा पर्यावरणाशी असणारा संबंध तपासता असता अनेक गोष्टी स्पष्ट होत गेल्या. त्यातील सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे अप्रत्यक्षपणे पर्यावरणावर होणारा वाईट परिणाम.

अनेक निसर्गरम्य, नविन पर्यटन स्थळ विकसित झाली, पर्यटक वाढले, आणि त्याबरोबर वाढले प्रदूषण, अतिक्रमण, संसाधनाची नासाडी, इतर जीवांना वाटणारी असुरक्षितता वगैरे वगैरे ... समुद्रात सोडण्यात येणारे सांडपाणी, त्यामुळे प्रवाळ सरख्या आणि इतर जीवांना निर्माण होणारा धोका, शॉपिंग मॉल्स, वोटर स्पोर्ट्स, हॉटेल्स, कसिनो, या मुळे झालेली गर्दी, वाढणारा कचरा, वाहनांमुळे वाढणारे प्रदूषण, आणि या सर्वांमुळे जंगलं, वन्यप्राणी, पक्षी, वनस्पती, डोंगर, दऱ्या, रस्ते, समुद्रकिनारे, समुद्रजीव, सर्व प्रकारच्या पर्यावरणाची झालेली केविलवाणी अवस्था...पर्वत डोंगरांची अवस्था सुध्धा

या पेक्षा वेगळी नाही. पर्यटकांची बेजवाबदार वर्तणूक, बेपर्वा वृत्ति, निसर्गाबद्दलची अनास्था, आणि क्वचित अज्ञान या गोष्टी प्रदूषण वाढण्यास कारणीभूत ठरू लागल्या. हिमालयावरील प्रदूषण, अनेक नद्यांची आणि दाल लेकची अवस्था, गढवाल आणि कुमाऊ आणि इतर अनेक ठिकाणची नष्ट होणारी जंगलं हे सर्व हेच तर दर्शवतात...एकूणच पर्यटकांमुळे होणारे प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्षपणे होणारे प्रदूषण, कचऱ्याचे अयोग्य नियोजन, हॉटेल्स, रिसोर्ट्सच्या जागेसाठी साठी तोडलेले जंगल, त्यामुळे होणारी जमिनीची धूप, कोसळणाऱ्या दरडी, मरणारे जीव, स्थानिक लोकांच्या समाज जीवनावर होणारे अतिक्रमण, हे देखील नजरेआड करून चालणार नाही. या पार्श्वभूमीवर ‘इकोटूरीझ्म’ ची कल्पना नाविन्यपूर्ण आणि उपयुक्त अशीच वाटते. एखाद्या ठिकाणी पर्यावरणास झेपेल तितकेच पर्यटक असावेत. पर्यावरणातील संसाधनांचा वापर अविचारीपणाने होऊ नये वगैरे वगैर... त्याला आपण ‘जवाबदार पर्यटन’ असेही म्हणू शकतो. निसर्गाच्या कलाने जाणारे पर्यटन आता संपूर्ण जगात दिसते. यामुळे पर्यटन व्यवसाय जास्त विकसित होईल, पर्यावरणाला होणारा त्रास आणि ऱ्हास कमी होण्यास

मदत होईल, एकेच ठिकाणी खूप गर्दी होणार नाही, उपलब्ध असलेल्या सोयी पर्यटकांना सहज उपलब्ध होतील, स्थानिकांचा सहभाग वाढेल ज्यामुळे त्यांना उपजीविकेची साधनं मिळतील, कायद्याचे पालन जास्त होईल आणि मग सगळ्याच गोष्टी सुटसुटीत होतील.

जवाबदार पर्यटनासाठी पर्यटन व्यावसाईक, स्थानिक पर्यटन विभाग, आणि शासन या सर्वांनी मिळून एकत्रित प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यातील प्रमुख मुद्दे म्हणजे- प्रत्येक पर्यटन स्थळाची नैसर्गिक क्षमता समजून पर्यटकांचा ओघ नियंत्रित करायला हवा. स्थानिक जैव विविधतेचे महत्त्व आणि माहिति पर्यटकांपर्यंत सहज पोचली तर त्याचा खूप फायदा होईल म्हणून ती तशी पोचविण्यात यावी आणि पर्यटनस्थळाच्या विकासाचा आराखडा आणि योजना दूरदर्शीपणाने आखलेल्या हव्यात. त्यामध्ये स्थानिक लोकांचा फायदा हा एक महत्त्वाचा मुद्दा असायला हवा आणि तशी सोय असायला हवी. प्रत्येक पर्यटकाचा यामध्ये सहभाग असावा आणि सर्वात महत्त्वाचे - शासनाचे धोरण बोटचेपी नसावे.

खास करून पर्यटन व्यावसायिकांनी काही गोष्टी जाणीव पूर्वक स्वीकारण्याची गरज वाटते. जसे पर्यटन स्थळाच्या पर्यावरणाविषयीची आणि तेथील नियमांची माहिती, त्याचे आपल्या आयुष्यातील महत्त्व, त्याचे संगोपन, या विषयीची माहिती प्रथमच पर्यटकांना द्यायला हवी. या बरोबरच स्थानिकांनी देखील सतर्क राहायला हवे. नव्याने उभ्या राहणाऱ्या अनधिकृत इमारती, होणारी जंगल तोड, जागेचा अनधिकृत वापर, या गोष्टींवर लक्ष ठेवून त्याची सूचना संबंधित विभागाला द्यायला पुढे यायला हवे. पर्यटन व्यावसायिक, शासन, आणि स्थानिक संस्था यांच्यातील सुसंवादाने 'इकोटूरीझम' परिणामकारक होईल परंतु 'जवाबदार पर्यटन' मात्र प्रत्येक व्यक्ती जवब्दारीने वागेल तेव्हाच प्रत्यक्षात येईल...

# कान्हा राष्ट्रीय उद्यान

भारतातील वाघांची प्रजाती टिकून राहावी, संरक्षित रहावी या हेतूने १९७३ साली व्याघ्र प्रकल्पाची सुरुवात झाली. वाघांसाठी विविध ठिकाणचे वनप्रदेश, जंगले, प्रकल्प क्षेत्राखाली राष्ट्रीयउद्याने अथवा अभयारण्ये, आरक्षित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आली. आजही काही मोजक्या उत्तम व्याघ्रप्रकल्पामध्ये ‘कान्हा’ची गणना होते. कान्हा हे मध्य प्रदेशातील व्याघ्र प्रकल्पातील अभयारण्य. जबलपूर पासून साधारण १६५ कि मी अंतरावर असलेल्या कान्हाचा परिसर म्हणजे घनदाट जंगल.

‘बारासिंगा’प्रकारच्या हरिणांना वाचविण्यासाठी सुरु झालेली राष्ट्रीय उद्यानाची कल्पना अखेर येऊन थांबली व्याघ्र प्रकल्पाशी. आजचे राष्ट्रीय उद्यान मंडला आणि बालाघाट या मध्य प्रदेशातील २ जिल्ह्यामध्ये पसरले आहे. सुप्रसिध्ध नोबेल पारितोषिक विजेते लेखक किप्लिंग यांना ‘जंगल बुक’ ही साहित्यकृती या उद्यानावरून सुचली. आम्ही महानगरी एक्स्प्रेसने जबलपूरला गेलो, तेथे एकरात्र मुक्काम करून सकाळी बसने निघून दुपारी १ च्या सुमारास ‘किसली’ ला पोचलो.

कान्हाचे जंगल हे ‘मिश्रपानझडी’ अथवा ‘मिश्रपर्णपाती’ प्रकारचे आहे. येथे साल वृक्ष मोठ्या प्रमाणात दिसतात परंतु त्याच बरोबर तेंदू, मोह,कौसुम, बांबू, आपटा, पिंपळ ही झाडे सुध्दा दिसतात. जंगलाचे ९४० कि मी हे कोर ( गाभा) क्षेत्र आहे. येथे सपुष्प वनस्पतीच्या

६०० पेक्षा अधिक प्रजाती आणि २०० पेक्षा अधिक पक्ष्यांच्या जाती आढळतात. सातपुडा पर्वतरांगामध्ये असलेले हे ठिकाण समुद्र सपाटीपासून ५०० – ९०० मीटर उंचीवर आहे. हे जंगल प्रसिध्द आहे वाघांसाठी म्हणजेच 'रॉयल बेंगाल टायगर' साठी... देशातील आणि परदेशातील अनेक पर्यटक येथे फक्त वाघ पाहण्यासाठी येतात. अभयारण्यातील किसली या ठिकाणी पर्यटन खात्यातर्फे राहण्याची चांगली सोय आहे. केवळ अधिकृत वाहनांनाच जंगलात प्रवेश दिला जातो आणि सर्व नियम काशोसीने पाळले जातात. सकाळी ७:०० ते ११: ०० आणि दुपारी ३:०० ते ६: ०० अशी या  सफरींची वेळ असते. संपूर्ण जंगलाची नंबरवार विभाग करून जिप्सीला ठरलेल्या विभागातच फिरता येते. जसे गवताळ प्रदेश, चेकपोस्ट्स, वारूळ, वौटरहोल्स वगैरे... एकदा जंगलात शिरल्यावर कोणत्याही कारणासाठी जीपच्या बाहेर पडण्यास मनाई आहे. या जंगलात जीप्सीतून मारलेली फेरी म्हणजे एक

अविस्मरणीय अनुभव होता. एरवी जंगल म्हणजे वन्यजीव आणि हिंस्त्रप्राणी, परंतु याही पुढे जाऊन जंगल किती सुंदर, गूढ आणि अंतर्मुख करणारे असते याचा अनुभव आला. प्राण्यांच्या अस्तित्वाच्या खुणा, पाऊलखुणा, बुन्ध्यावरील नखांनी ओरबाडलेल्या खुणा, प्राण्यांच्या विष्ठा, पक्ष्यांचे आवाज, अलार्म कॅल्स, पाण्याची खळखळ, आणि या सगळया मध्ये अगदी आवाज न करता फिरणारा माणूस... या सगळ्याचे मिळून बनते जंगलाचे वातावरण, अनाकलनीय... हे अनुभवून खूप समृध्द व्हायला होते. निसर्गाशी जवळीक साधता साधता कितीतरी गोष्टी उलगडू लागतात.आपण माणसांनी आपणहून स्वतःकडे घेतलेले इतर प्राण्यांचे हक्क किती अस्थानी आहेत याची जाणीव होऊ लागते. येथे दिसणारे प्राणी म्हणजे हरणं, रानडुक्कर, बारासिंगा, काळवीट, सांबर, भेकर, वाघ, गवा, शिकारी कुत्रा, रानमांजर वगेरे... दुसऱ्या दिवशीची सकाळची फेरी पण संपली.


(c) Kaushal Jain
फोटो – कौशल जैन

प्रत्येक फेरीमध्ये आम्हाला काहीनाकाही दिसत होते, वाघ मात्र दिसत नव्हता.

अचानक सारे जंगल स्तब्ध होते, लंगुर्स (वांदरं) सर्वांना सजग करतात, झाडावरील  टरीपाय नावाचा पक्षी ओरडतो, हरणं स्तब्ध होऊन एक विशिष्ठ आवाज देतात. आम्ही सर्व शांत, स्तब्ध, वाघाला शोधणारी नजर... आसपासच्या परिसरात असलेली त्याची उपस्थिती थारकावत असतांनाच एकदम सावकाशपणे पुढे चालणारा वाघ दिसावा...

ड्रायव्हर ने ब्रेक मारला आणि गाडी हळू केली... अहाहा ... डोळयांचे पारणे फिटले... ती सतेज कांती, सावकाश पण दमदार पावले टाकीत पुढे चाललेला वाघोबा आणि मागून संथपणे जाणारी आमची जीप... आम्हाला त्याचा चेहरा पहायचा होता... आम्ही दबक्या आवाजात बोलत असतांनाच अचानक, तो थांबला अन त्याने मागे वळून पाहिले मात्र... ठोका चुकला!! आनंद, विस्मय, भीती, अशा संमिश्र भावना उमटत असताना कोणीतरी भानावर येऊन टिपलेले फोटो... हे नाट्य १-२ मिनिटे चालले असेल... आणि अचानक तो खाली उतरून जंगलात दिसेनासा झाला.



आम्ही एकदम खुश होतो. हॉटेलवर आल्यावर देखील तीच चर्चा... त्याच्या देखण्या रुपाची... हा असा काळजाचा ठोका चुकविणारा अनुभव आयुष्यात प्रत्येकाने घ्यायलाच हवा... रात्री आमच्या मागच्या अंगणात नजर टाकली असता, अनेक दिवे जोडी जोडीने उजळलेले दिसले आणि आम्ही अवाक झालो... इतके सुंदर दृश्य होते ते... आमच्या अंगणात हरणं आली होती. रात्री छान झोप लागली.




फोटो – कौशल जैन

कान्हा रिझर्व्ह मधील खटीया या ठिकाणी एक छानसे म्युझियम आहे. येथील प्राणी, त्यांच्या सवयी, वनस्पती, इथला निसर्ग या विषयीची सुंदर आणि विस्तृत माहिती येथे उपलब्ध आहे. अगदी सकाळी अथवा संध्याकाळी धनेश (ग्रे हॉर्नबील), हुदहुद (हुप्पी), पन्नगाद (सर्पंट इगल), रेकेट टेल्ड ड्रोन्गो, रोलर, चक्रांग (कॉमन टील), मोर, पोपट, चित्रबलाक ( पेंटेड स्टोर्क), मिनिवेट, असे अनेक पक्षी दिसतात. इतर पक्ष्यांच्या आवाजाची नक्कल करणारा रेकेट टेल्ड ड्रोन्गो, संथपणे उडणारे धनेश (हॉर्नबील), आकाशात रंग उलगडत उडणारा रोलर आणि सुंदर पिसारा फुलवून नाचणारा मोर... मन खुश होते. मध्य प्रदेश पर्यटन विभागातर्फे विक्रीस असणारी पोस्टर्स, कार्ड, कि चेन्स, पुस्तके असे काहीबाही इथली आठवण म्हणून खरेदी केले आणि परतीच्या वाटेला लागलो.




फोटो – कौशल जैन

एकूणच जंगलाची शान वाढविणारे प्राणी आणि प्राण्यांना आश्रय देणारे जंगल... वाघाच्या जीवाशी खेळण्यापेक्षा त्याला वाचविण्याची कल्पना, गरज खूप मोठी आहे... वाघ वाचला तर संपूर्ण परिसंस्था वाचेल, मोठा जैविक ठेवा वाचेल, आणि पर्यावरणाचा समतोल सांभाळण्यात त्याची मदत होईल.

## रणथंभोर – वाघांचा इलाका

निसर्गाच्या सान्निध्यात, सर्वांबरोबर, असूनही अंतर्मुख होऊन खरा आनंद घेण्याची संधी म्हणजे जंगलसहल. 'रणथंभोर' - राजस्थानातील हे वाघांचे अभयारण्य सुरुवातीच्या ९ अभयारण्यांपैकी एक. अनेक वर्षांपासून राजस्थानचा हा भाग वाघांचा इलाका म्हणून प्रसिध्द आहे. रणथंभोर हे नाव तेथील किल्ल्यावरून पडले असावे. हा किल्ला ११ व्या शतकापासून अस्तित्वात आहे. किल्ल्यावर राजपूत आणि मोगल यांनी आलटून पालटून राज्य केले असे इतिहास सांगतो. १९८१ मध्ये हा प्रदेश राष्ट्रीय उद्यान म्हणून जाहीर करण्यात आला.


Ranathambore.com

विद्यार्थ्यांच्या बरोबर केलेली ही ‘रणथंभोर’ची अभ्याससहल माझ्या कायम लक्षात राहील. आम्ही जयपूर एक्स्प्रेसने प्रवास करून सवई माधोपुर या ठिकाणी उतरलो. स्टेशन जवळील एका हॉटेल वर मुक्काम केला. सवाई माधोपुरपासून जंगलपार्क १२-१३ कि मी वर आहे. परंतु त्यावेळी केंटर अथवा जिप्सीच्या आरक्षणाची व्यवस्था  हॉटेल मधूनही होत असे. ही जंगल सफर सकाळी ७ : ३० ते १० : ३० आणि दुपारी ३ : ०० ते ६ : ०० या वेळेत होती. आरवली आणि विंध्य पर्वतांच्या रांगा असलेले हे अभयारण्य हे ‘कोरडे पर्णपाती’ प्रकारचे आहे. या जंगलात प्रामुख्याने धोक, आंबा, वड, पिंपळ , नीम, बाभूळ, तेंदू अथवा तेम्बुर्णी, खजूर, कदंब अशी अनेक वृक्षराजी दिसते. याचे क्षेत्र १३३४ वर्ग कि मी. इतके असून हे सवाईमाधोपुर या जिल्ह्यामध्ये आहे.

या अभयारण्याचे वैशिष्ठ्य म्हणजे संपूर्ण अरण्यात असलेल्या ऐतिहासिक वास्तू - किल्ला, किल्ल्यावरील गणेश मंदिर, गार्ड पोस्ट, अधून मधून दिसणारी तटबंदी आणि क्वचित त्या वास्तूंमध्ये आश्रय घेणारा वाघ. सरासरी ८०० मी मी इतका पाऊस पडणाऱ्या या जंगलात साधारण २५० जातींचे वृक्ष, १०० जातींचे गवत, २०० पक्ष्यांच्या प्रजाती आणि २०-२२ प्रकारचे सस्तन प्राणी आढळतात. राजबाग लेक, पदम लेक, आणि मलिक लेक ही ३ मोठी जलाशये वर्षभर येथील वन्यजीवांची तहान भागवतात. कोरडे हवामान असणाऱ्या या प्रदेशात, उन्हाळ्यातील तापमान ४० ते ४६ अंश सेल. इतके असते तर हिवाळ्यात ते शून्य अंशापेक्षा खाली जाण्याची शक्यता असते.

केन्टर मधून जंगलातून फिरतांना रानडुक्कर, नीलगाय, चिंकारा,सांबर, चितळ, मुंगुस, रानमांजर, वाघ, अस्वल असे अनेक वन्य पशू दिसतात. जंगलातून मारलेल्या प्रत्येक फेरीगानिक आम्हाला अगदी ताजे ‘पगमार्क्स’ म्हणजेच वाघाच्या पाऊलखुणा दिसल्या परंतु वाघ मात्र दिसला नाही...

अर्थात जंगलात असण्यातील आणि आपल्या जवळपास वाघ आहे ही जाणीव देणारा आनंदही तेव्हढाच महत्वाचा... त्रिपाय पक्षी, वांदरे, आणि सांबर यांचे कॉल्स येऊनही आणि आम्ही स्तब्ध रहात प्रतीक्षा करूनही वाघोबाचे दर्शन झाले नाही. २०१९ च्या गणनेनुसार रण थंभोर येते ७१ वाघ आहेत.

वाघ दिसला नाही परंतु मगरीने सांबराची केलेली शिकार, दोन नर हरिणांचे एकमेकाला भिडणे आणि अस्वलाचे झालेले दर्शन तितकेच सनसनाटी होते. अस्वल आमच्यापासून साधारण १०० फुटांवर असेल. एका झाडाच्या बुंध्याशी ते कशाचा तरी शोध घेण्यात मग्न होते. त्याला कोणाचीच पर्वा नव्हती. आम्ही मात्र सर्व जण श्वास रोखून त्याच्याकडे पहात होतो. काही मिनिटातच ते आमच्या समोरून निघून गेले. ते निघून गेल्यावर मात्र आम्ही त्याच्या पावलांचे ठसे पाहिले. वन्यप्राणी सहसा आपणहून तुमच्या वाटेला जात नाहीत हेच खरे...


अस्वल

प्रत्येक फेरीत वाढणारी उत्कंठा, वाघासाठी आसुसलेली नजर, आणि जंगलातील वेगवेगळ्या रुटवर फिरणारे आम्ही....आम्ही पदम लेकवर वाघाची चाहूल घेत थांबलो असतांना एक मगर पाण्यातील सांबर ओढून नेतांना दिसली. काही मिनिटापुर्वीचा इतिहास होता  तो....आमच्या आधीपासून तिथे थांबलेल्या केंटर मधील माणसं त्या सांबराच्या मृत्यूची साक्षीदार होती. आवाजाची चाहूल लागताच मगर पाण्याखाली गडप झाली. चाहूल कमी झाली कि ती आपल्या शिकारीला ओढत सुरक्षित ठिकाणी नेण्याच्या प्रयत्नात होती. सहजासहजी न दिसणारे ते दृश्य पाहत आम्ही काही वेळ थांबलो. स्वतःचे अस्तित्व टिकविण्यासाठी निसर्गाने प्रत्येक सजीवाला, धडपड, संघर्ष, कुणावर तरी मात करणे या उर्मी दिल्या आहेत.

रणथंबोरच्या सहलीत आम्हाला १०० पेक्षा अधिक प्रकारचे पक्षी पाहायला मिळाले. सर्पंटइगल, टिटवी, अगदी हातावर आपल्या हातावर बसून बिस्कीट खाणारा ट्रीपाय, बगळे, गिधाडं, तीन प्रकारचा खंड्या, ढोलीत बसलेली घुबडांची पिल्लं, स्टोर्क्स, २ प्रकारचे पोपट, पंख वाळवत बसलेला कोर्मोरंट, डार्टर, सुंदर सोनेरी सुतार पक्षी, आणि असे अनेक...



ट्रीपाय

त्यावेळी फतेहसिंगजी यांच्याशी झालेली बातचीत कायम लक्षात राहील. फतेहसिंगजी हे राजस्थान व्याघ्र प्रकल्पाचे पहिले अध्यक्ष... त्यांचे साधारणतः ३० वर्षे जंगलात वास्तव्य होते... “इथे मानवभक्षी वाघ आहे का’ असे एका विद्यार्थ्याने विचारले असता, त्यांनी दिलेले उत्तर खूप वेगळे परंतु योग्य होते. ते म्हणाले, “असा शब्द प्रयोग पुन्हा करायचा नाही, वाघाच्या पर्यावरणावर अतिक्रमण कोणी केलेय? त्याला मानव भक्षी कोणी बनविले? त्यालाही जगण्याचा हक्क आहे हे नेहमी लक्षात ठेवायचे.”



रणथंभोर किल्ला ( Wikipedia )



(फोटो – किशोर कोकाटे)


(फोटो – किशोर कोकाटे)



(फोटो – किशोर कोकाटे)

जगातील वाघांपैकी २/३ वाघ भारतात आहेत. कारण त्याला अनुकूल असा पुरेसा अधिवास आहे. भारतात वाघ वाचला नाही तर तो जगात कुठेही वाचणार नाही हे एक कटू सत्य आहे आणि म्हणूनच आपण आपली जंगलं, त्याचा अधिवास वाचविण्याची गरज आहे. व्याघ्र प्रकल्पातून हे बऱ्याच प्रमाणात साध्य झाले आहे.

## बांधवगड – एक अनोखा अनुभव

आपण पर्यावरण, वातावरण बदल, वन्यजीव संरक्षण, नष्ट होणारी जंगलं, निसर्गाची काळजी वगैरे विषयी अनेकवेळा बोलतो परंतु खऱ्याअर्थाने वन्यजीवांना त्यांच्या नैसर्गिक अधिवासात पाहण्याचा अनुभव खरोखरच अनोखा असतो आणि त्यासाठी प्राण्यांना संपूर्ण अभय असलेल्या सुरक्षित जंगलात जायला पाहिजे. बांधवगड राष्ट्रीय उद्यान १९६८ साली अस्तित्वात आले आणि त्यानंतर १९९३ साली ते व्याघ्र प्रकल्पामध्ये समाविष्ट केले गेले.

सुंदर दाट झाडी आणि अनेक बांबूची बने असलेले हे अभयारण्य म्हणजे मध्य प्रदेशातील ‘उमरीया’जवळ असलेले ‘बांधवगड’.

रेवा संस्थानाच्या महाराजांचे शिकारीचे ठिकाण. रेवा हे ठिकाण पांढऱ्या वाघांसाठी प्रसिध्द. विंध्य पर्वतराजी मधील मध्य प्रदेशाच्या पश्चिमपूर्व अंगाने असलेले बांधवगड....जबलपूरहून १९० कि मी.वर असलेले हे सुंदर जंगल. स्वतःचे वाहन असेल तर तसे पोचणे सुकर....परंतु प्रबळ इच्छाशक्ती घेऊन मजल दरमजल करीत तेथे पोचण्यातही एक वेगळीच गम्मत आहे. ही काही वर्षापूर्वीची गोष्ट आहे. जबलपूरहून  कटनी...कटनीहून उमरीया आणि उमरीयाहून बांधवगड असा तो प्रवास होता. बांधवगड येथील तला रेंज मधील डोंगर हे वाळूच्या खडकाचे आहेत आणि तेथील माती जास्त वालुकामय आहे. बांधवगडचा ७१६ चौरस कि मी इतका कोअरझोन आहे आणि त्याचे विभाग आहेत तला, मगधी आणि कतौली.  या अभयारण्यात ठिकठिकाणी पाण्याचे झरे दृष्टीस पडतात.

पावसामुळे वर्षातील ४ महिने हे अभयारण्य प्रवाशांसाठी बंदच असते. येथील जंगल हे ओलसर मिश्र पर्णपाती प्रकारचे आहे. येथे अनेक ठिकाणी बांबूची बने आहेत त्या बरोबरच तेथे कुरणे, टेकड्या, पठार सुध्धा दिसतात. जंगलाचा बराचसा भाग साल या झाडांनी व्यापलेला आहे. त्या बरोबरच आंबा, तेंदू, आवळा, कदंब,पळस, जामून, खैर, मोह, खेजडा हे वृक्ष देखील आढळतात. डोंगरावर एक किल्ला आहे आणि तेथेच एक विष्णूचे देऊळ आहे. एकूणच येथील वन्यजीवन सुरक्षित अशा नैसर्गिक वातावरणात आहे. उघड्या जिप्सीमधून जंगलात फिरण्याचा अनुभव अवर्णनीय असा असतो आणि तो ज्याचा त्यानेच घ्यायला हवा. जिप्सीतून ३ तासाची एक फेरी - एका जिप्सीमध्ये ५ माणसं ....आणि प्रत्येक फेरीत जंगलाचा अनुभव वेगळा....जीपचा चालक आणि एक वाटाड्या अर्थात गाईड. त्या दोघांनाही जंगलातील सर्व वाटा आणि रस्ते माहित असतात.

त्या दोघांचे गुण जमले तर उत्तमच....येथे वाघाचे दर्शन हमखास होते कारण जंगलाच्या विस्ताराच्या मनाने वाघांची संख्या जास्त....जंगलातून फिरतांना धनेश, इंडिअन रोलर, किंग फिशर्स, ३ प्रकारचे धोबी (वागटेल्स), कोतवाल, वंचक (पोंड हेरोंन्स), भारतीय गिधाड, अनेक प्रकारची बदकं, सरुची (पिंटेल्), शिक्रा, पांढरे घुबड, असे अनेक नेहमी दिसणारे तसेच काही विशेष पक्षी दिसतात. या जंगलात मोर,खाटिक, टिटवी, बुलबुल आणि भारतीय नीलकंठ (इंडिअन रोलर) हे पक्षी तर सतत दिसत होते.



Indian Rollar( photo: twitter.com)

..पहिल्या दिवशीच्या राईडच्या वेळी बराचवेळ वाघ दिसला नाही परंतु त्याच्या जवळपास असण्याचा पुरेपूर अनुभवमात्र आम्ही  घेतला. कारण आम्हाला रस्त्यावरील वाळूत सतत त्याची ताजी पावलं दिसत होती. पावलं पाहून,... अगदी १० मिनिटापूर्वी तो इथेऊन चालत गेला या विचारानेच खूप रोमांचित व्हायला होत होतं. श्वास रोखून पावलांचा मागोवा घेत जिप्सीतून फिरणे हा खरा जंगलाचा अनुभव, प्रत्येक वेळी काही वाघ दिसायलाच हवा असे नसते....तो एक चान्स असतो....जंगलात फिरतांना कान, डोळे उघडे ठेवले तर खूप काही पाहायला मिळते...एके ठिकाणी पावले आत झाडीत जातांना दिसली....झाडीला वळसा घालून आम्ही थांबलो...तेव्हढ्यात सगळी कडून काल्स सुरु झाले...हे काल्स जीवाचा थरकाप करतात...एक अनोखे कुतूहल, उत्सुकता....

तेव्हढ्यात एक डरकाळी ऐकू आली...पगमार्क्स वरून ती वाघीण असावी असा ड्रायव्हरचा अंदाज होता...आजूबाजूचे प्राणी एकमेकांना जणू सावध करत होते....होशियार, असाल तेथेच थांबा. वांदरांचा तो विशिष्ठ आवाज, हरिणाचा तो छोटासा कॅल(call) आणि ट्रीपाय पक्ष्याच्या आवाज....या सगळयामुळे एक वातावरण बनले. या सगळयाचा अर्थ एकच होता. वाघोबा (रॉयल बेंगाल टायगर), अगदी जवळ त्याच्याच रुबाबात चालत आहेत. गाडीचे इंजिन बंद केले. सगळे कसे स्थब्ध..आपल्या श्वासाचा देखील आवाज येणार नाही याची काळजी घेत थांबलेले आम्ही......वाळलेल्या पानांवर पावले पडण्याचा आवाज....हलकी गुरगुर.....काही क्षण गेले असतील आणि अखेर तो क्षण आला....आमच्या ड्रायव्हरचा अंदाज खरा ठरला.



चितळ ( photo:tourmyindia.com)



Royal Bengal tiger

आमच्या जिप्सी समोरून साधारण ४० फुटावरून ती रस्ता ओलांडून पलीकडे गेली.... काही क्षणांसाठी झालेले दर्शन....हलक्याश्या उन्हात चकाकणारी तुकतुकीत पट्टेरी त्वचा, ८-१० फुटाची लांबी आणि दमदार पावले ....हाच तो कॅटवाक.... रस्ता ओलांडताना क्षणभर थांबून आमच्याकडे पाहिले. तिची ती नजर आणि आमचे रोखलेले श्वास..कोणी पटकन फोटो काढले, तर कोणी डोळेभरून पाहिले... शेवटी आपल्या डोळयांचा कॅमेरा उत्तम..कायम स्मरणात राहणारा....ते काही क्षण म्हणजे अवर्णनीय!



Bison. Photo – mumbaitravellers.in

आम्हाला या जंगलात बार्किंग डीयर, स्पोटेड डियर, सांबर, बिबट्या, कोल्हे,सिवेत मांजर, रानडुक्कर असे इतरही अनेक वन्य प्राणी दिसले. काही ठिकाणी हरणांचे संपूर्ण कुटुंब, तर काही ठिकाणी मोठा कळप....क्वचित स्तब्ध होऊन फोटोला ‘पोझ’पण देत होते.....दुसऱ्या दिवशीसुध्दा आम्ही २ फेऱ्या मारल्या जंगलात....प्रत्येक वेळी आलेला वेगळा अनुभव. जिवंत जंगल म्हणजे काय याचा वस्तुपाठच जणू...वाघ दिसो अथवा न दिसो, जंगलाचा अनुभव प्रत्येकाने घ्यायलाच हवा......परतीचा प्रवास करून एक सुंदर अनुभव घेऊन पुन्हा धकाधकीच्या मुंबईत आम्ही हजर झालो........

## महाराष्ट्राचे भरतपूर - नांदूर - मधमेश्वर पक्षी अभयारण्य

नांदूर मधमेश्वर पक्षी अभयारण्य महाराष्ट्रातील नाशिक जिल्ह्यातील निफाड तालुक्यात आहे. **नाशिकपासून ५० कि मी** वर भिवंडी – कल्याण रस्त्याने घाटातून वाट काढत आमची बस चालली होती. बापगाववरून शहापूरहून आम्ही नाशिकच्या वेशीवर पोचलो. औरंगाबाद रस्त्याने पुढे जात आम्ही सायखेडवरून नांदूर ला पोचलो. आमची राहायची सोय गेस्ट हाउस मध्ये झाली होती त्यामुळे आम्ही अगदी अभयारण्याच्या आतच होतो.

नदीच्या पात्रावर बांधलेले धरण, धरणाच्या पाण्याने हिरवीगार झालेली जमीन, मधमेश्वर मंदिर, आणि बाजूच्या कपारीत शेकड्याने असलेली पाकोळी (क्लिफ स्वालो) ची घरटी. ही घरटी माती आणि लाळ एकत्र करून खडकाच्या आडोशाला माठासारखी दिसणारी असतात... येथे ३-४ प्रकारच्या परिसंस्था आढळतात. खुली गवताळ जमीन, पाणथळ, पाण्याखाली येणारी जमीन आणि खडकाळ जागा... या मुळेच येथे विविध प्रकारचे पक्षी वास्तव्य करून आहेत. काही येथील रहिवासी तर काही हिवाळ्यात येणारे पाहुणे अर्थात स्थलांतरित पक्षी.. गेली अनेक वर्षे पक्ष्यांच्या सान्निध्यात राहणारे पक्षीतज्ञ श्री. उगावकर यांचे मार्गदर्शन मिळाले. पक्षी निरीक्षणातील गम्मत, त्यातून मिळणारा आनंद प्रत्येकाने अनुभवायला हवा. पक्ष्याची शिळ, गाणे, सुंदर रंग, त्यांची घरटी, त्यांच्या सवयी आणि लकबी, हे सगळे वेड लावणारं होतं.

आम्ही साधारण १ च्या सुमारास तेथे पोचलो, जेवण वगैरे उरकून आम्ही दुपारी ३:३० च्या सुमारास माळरानावर निघालो. नांदूर मधमेश्वरचे क्षेत्र सुमारे १०० चौ. कि. मी. इतके आहे. किती पक्षी पाहायला मिळावेत... नजर जाईल तेथे पक्षी... या ठिकाणाला महाराष्ट्राचे भरतपूर का म्हणतात ते तेव्हा लक्षात आले. पक्षी निरीक्षकांच्या नोंदीनुसार येथे २४० पेक्षा अधिक प्रजातींचे पक्षी आढळतात. स्थलांतराच्या काळात एकूण पक्ष्यांची संख्या हजारोंच्या घरात जाते.

२ दिवसात ७० विविध प्रजातीचे पक्षी आम्ही पाहीले. आमच्या आवारात धनेश, स्वर्गीय नर्तक, हे सतत आणि सहज दिसत होते. 'पाराडाइझ फ्लाय केचर' पहिला की नजरेचे पारणे फिटते. खुप सुंदर पक्षी... काळे-जांभळे डोके, आणि बाकीचा शरीराचा भाग पांढरा, शेपटी पर्यंत जाणारे लांब  पांढरे पट्टे ... एका फांदीवरून दुसऱ्या फांदीवर उडत जाणारा हा पक्षी पाहणे म्हणजे खरोखर स्वर्गीय आनंद... त्यानंतर आम्ही आमच्या आवारापासून लांब असलेल्या पाणी असलेल्या ठिकाणी पोचलो. मुग्धबलाक (ओपन बील स्टोर्क), टिटवी, खाटिक (श्राइक), पांढरा शराटी (पांढरा ऐबीस), भोवत्या (मार्श हेरीयरची जोडी) , सूर्य पक्षी, बुलबुल, हळद्या, असे अनेक पक्षी पावलागणिक दिसत होते.


पाण्यातील पक्षी पण खूप होते. जसे चक्रांग (टील), स्पॉट बील, तुतवार (सेंड पायपर), राखी बगळा( ग्रे हेरॉन), चित्र बलाक (पेंटेड स्टोर्क) , जांभळी पाणकोंबडी, भिवई (गार्गनी डक), पाणलावा (स्नैप), ब्राऊन हेडेड डक, अगदी हिमालयातून येणारे पांढरा शराटी (पांढरा आयबीस) असे अनेक पक्षी लांबून सुध्धा दिसत होते. हिमालयाच्या डोंगराळ भागातून आलेले तुतवार (रेड शेंक), लडाख मधून येणारे शारजा (स्पॉट बील)आणि शेकाट्या हे पक्षी बघण्याचे भाग्यही आम्हाला लाभले.

अगदी चालता चालता समोर दिसणारे पक्षी म्हणजे मुनिया, ३ प्रकारचे वेगटेल, सुगरण, पाणथळी चरचरी (पिपिट), चंडोल (लार्क), खंड्या, रोझी पास्तर्स, आणि लाल सातभाई बडबड्याची सततची बडबड. हे सगळे पाहण्यात आणि ऐकण्यात खूप मजा आली. परतल्यावर रात्री  सरांनी पक्ष्यांच्या 'रीन्गिंग' विषयी माहिती दिली. दिवसभर पाहिलेल्या पक्ष्यांची उजळणी केली. दुसरे दिवशी सकाळी लवकर जायचे होते पक्षी निरीक्षणाला... रात्री आम्हाला स्पोटेड घुबड दिसले. आम्ही पेटवलेल्या छोटयाशा शेकोटीचा आणि आमच्या आवाजाचा बहुदा त्याला त्रास होत असावा... दुसरे दिवशी सकाळी लवकर उठून कॅमेरे, बायनोक्यूलर वगैरे आयुधे घेऊन आम्ही निघालो.



spoon bills and storks फोटो: श्री. किशोर वडनेरे


फोटो: श्री. किशोर वडनेरे



फोटो: श्री. किशोर वडनेरे

आज आम्ही धरणाच्या दिशेने प्रयाण केले. तेथील मचाण वरून आज आम्ही निरीक्षण करणार होतो. मचाण वरून मुग्ध बलाक यांचे (ओपन बिल्ड स्टोर्क) थवे आणि मार्श हेरीयर्सचे बकध्यान पाहण्यातील आनंद केवळ अवर्णनीय होता.

गोदावरी आणि कादवा नदीवरील हे धरण... ब्रिटीशांच्या काळात बांधलेले आहे असे समजले. धरण्याच्या पाण्यामुळे गाळाने तयार झालेल्या बेटावर आणि तेथील पाणवनस्पतीवर तर पक्षी अवलंबून असतात कारण तेथे त्यांना मासे, शैवाल, दलदलीतील कीटक असे अन्न उपलब्ध असते. डॉ.सलीम अली यांच्या मागणीवरून १९८६ मध्ये हे ठिकाण पक्षी अभयारण्य म्हणून अधिसूचित करण्यात आले. २०२० मध्ये या ठिकाणाला 'रामसर स्थळ' म्हणून मान्यता मिळाली. रामसर स्थळांच्या यादीत समाविष्ट होणारे हे महाराष्ट्रातील पहिले ठिकाण आहे. तज्ञ व्यक्तीबरोबर असल्यामुळे पक्षी नेमके कुठे पहायचे, कोणत्यावेळी पहायचे, कसे पहायचे या गोष्टीचे मार्गदर्शन मिळणे गरजेचे असते ते आम्हाला मिळाले आणि म्हणूनच अभयारण्याचा अधिकृत गाईड मिळाल्या शिवाय तेथील पक्षी दिसणे कठीणच वाटते.

मधमेश्वरचे शंकराचे देऊळ  हे हेमाडपंथी धाटणीचे आहे. एक गोष्ट निश्चित कि पक्ष्यांना हवे तसे विविध प्रकारचे पर्यावरण/ अधिवास येथे उपलब्ध असल्यामुळे अधिकाधिक पक्षी येथे येतात. हा पक्ष्यांचा मेळा नोव्हेंबर ते मार्च पर्यंत भरलेला असतो. ज्याला जशी संधी मिळेल तसे प्रत्येकाने एकदा तरी या अभयारण्याला जरूर भेट द्यायला पाहिजे कारण काही गोष्टी ज्याच्या त्यानेच अनुभवायला हव्यात, नाही का?

दुर्ग दुर्घट भारी

*आसेतूहिमाचल*

सुंदर हा देश

त्या सुंदर यात्रेसाठी

www.esahity.com वर महाराष्ट्र, भारत व जग प्रवासाची अतिशय सुंदर प्रवासवर्णनं आहेत. तुमच्याआमच्यासारख्या लोकांनी आपापले प्रवास अनुभव शब्द आणि छायाचित्रांतून मांडले आणि पाठवले. ई साहित्यच्या टीमने त्याची सजावट वगैरे करून त्यांना पुस्तकरूप दिलं. अशी शंभराहून अधिक पुस्तकं आता ई साहित्यवर आहेत. आणि ही संख्या काही हजारांत जाईल याची आम्हाला खात्री आहे. कारण...

कारण आपण लिहीणार आहात. आपण जिथे जिथे फ़िरायला जाल तिथले फ़ोटो व वर्णनं पाठवा. आपण जिथे रहाता त्या परिसरातील ठिकाणांचे फ़ोटो व माहिती पाठवा. ते प्रसिद्ध पर्यटनस्थळ असेल

वा नसेल. तुम्हाला ते स्थळ आवडलं ना? मग लिहा. पाठवा. अलंकारिक भाषेची चिंता करू नका. बाकी सगळं आम्ही बघून घेऊ.

संपुर्ण जग, संपुर्ण भारत देश, महाराष्ट्रातला प्रत्येक जिल्हा, प्रत्येक तालुका आणि प्रत्येक गाव सुंदर आहे. आणि त्याचं सौंदर्य पाहू शकेल असा कोणीही दिव्यदृष्टीचा पाईक आमच्या या "मी पाहिलेला..." सिरीजमध्ये भाग घेऊ शकतो.

याचा फ़ायदा त्या त्या ठिकाणाला भेट देणाऱ्यांना होईल. किंवा परदेशात राहणाऱ्या मराठी वाचकांना त्या जागेला भेट दिल्याचा आनंद मिळेल. किंवा प्रकृती अस्वास्थ्यामुळे फ़िरू न शकणारे जीव त्याचा आनंद घेतील. वाटा. आनंद वाटा. वाटा आणि वळणांचा आनंद वाटत रहा.

आपल्या लेखनाची मेल व foto पाठवा.

esahity@gmail.com